**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आण्णाप्पा जिवाप्पा कमतगी
सी-२२१, सोपाननगर, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
२१३०, ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
२१३०, ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आण्णाप्पा जिवाप्पा कमतगी
सी-२२१, सोपाननगर, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
२१३०, ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.रमेश विठ्ठल दापके

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
२१३०, ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.सुमंत रामचंद्र साळुंखे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.८.२००७ व ७.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.१२.२००७ व १०.१२.२००७ |
| ५ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या जागेवर मागासवर्गीय व्यक्तीची नेमणुक केली असल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, २१३०, ई, ताराबाई पार्क, जि.कोल्हापूर यांनी दिले. परंतु ते चुकीचे आहे. आपली बदली चुकीच्या मार्गाने केली. तीन महिन्यांचा पगार दिला नाही, सेवानिवृत्ती वेतन देण्यास १९ महिन्यांचा कालावधी लावला. याबाबतचा अन्याय दूर व्हावा अशी आपली मागणी असून माहिती मिळालेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.आण्णाप्पा जिवाप्पा कमतगी यांनी केले.

श्री कमतगी यांनी शिवाजी विद्यापीठाकडे अर्ज केला होता. विद्यापीठाने तो संस्थेकडे पाठविला. त्यांची नियुक्ती एक वर्षासाठीच होती. दिलेली माहिती योग्य असून ज्या काळात काम केले, त्याचा पगार दिला आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, २१३०, ई, ताराबाई पार्क, जि.कोल्हापूरश्री.सुमंत रामचंद्र साळुंखे व अपिलीय प्राधिकारी तथा कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, २१३०, ई, ताराबाई पार्क, जि.कोल्हापूर श्री.रमेश विठ्ठल दापके यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या अन्य तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. भारत गणेश उबाळे
शांतीनगर, येरवडा, पुणे-४११ ००६. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक,
आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) उत्तरवादी
नवीन मध्यवर्ती इमारत, पहिला मजला, पुणे-१

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग)
नवीन मध्यवर्ती इमारत, पहिला मजला, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७३/2009/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. भारत गणेश उबाळे
शांतीनगर, येरवडा, पुणे-४११ ००६.

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक,
आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग)
नवीन मध्यवर्ती इमारत, पहिला मजला, पुणे-१ श्री. व्ही.डी. खानंदे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग)
नवीन मध्यवर्ती इमारत, पहिला मजला, पुणे-१ श्री. बी.बी.भिंगारे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.७.२००९, २९.७.२००९, ७.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.८.२००९, १०.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.८.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (ज़ोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे यांच्यातर्फे सन २००९-मध्ये झालेल्या प्रयोगशाळा परिचर भरतीमध्ये भ्रष्टाचार झाला आहे. आपण नियुक्तीस पात्र असूनही आपली निवड केलेली नाही. आपली उत्तरपत्रिका बदलण्यात आली. अनेक उमेदवारांच्या उत्तरपत्रिका एकाच हस्ताक्षरातील असल्याचे उघड होईल म्हणून इतरांच्या उत्तरपत्रिका दिल्या जात नाहीत. तसेच निवड समितीच्या पाच अधिकाऱ्यांनी प्रत्येक उमेदवारास दिलेल्या गुणांची प्रत, तसेच स्पर्धक उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांच्या प्रतीही जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे यांनी दिलेल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. भारत गणेश उबाळे यांनी केली.

श्री. उबाळे यांनी याच संदर्भात सुमारे २० अर्ज केले असून वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. अन्य उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती त्रयस्थ पक्षांच्या असल्यामुळे त्यांना दिलेल्या नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे श्री. बी. बी. भिंगारे यांनी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये शासकीय कारभारातील पारदर्शकता अभिप्रेत आहे. 'शासकीय सेवेतील भरतीप्रक्रिया पारदर्शक असली पाहिजे. तसेच संबंधित उमेदवारांप्रमाणेच नागरिकांनाही निवडीबाबतची सर्व कागदपत्रे जाहीररीत्या उपलब्ध असली पाहिजेत. उत्तरपत्रिका व मौखिक परीक्षेतील गुण हा यातील महत्त्वाचा भाग आहे, हे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील तरतुदीनुसार भरती प्रक्रियेतील उत्तरपत्रिकांसह सर्व माहिती नागरिकांना उपलब्ध असणे अपरिहार्य ठरते. उत्तरपत्रिका व गुणपत्रिका विविध उमेदवारांच्या असल्या तरी तो निवडप्रक्रियेचा भाग असल्यामुळे माहिती खाजगी अथवा त्रयस्थ पक्षाची मानता येणार नाही,' असा

निर्णय आयोगाने तक्रार क्र. २९८/पुणे/२००८ मध्ये दि. ६.११.२००९ रोजी दिला आहे. तो या संदर्भातही लागू आहे.

भरतीमधील भ्रष्टाचार व उत्तरपत्रिका बदलणे याबाबतची अपीलकर्त्याची तक्रार या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत. मात्र शासकीय कारभारातील पारदर्शकतेच्या दृष्टीने भरतीप्रक्रियेतील संपूर्ण तपशील नागरिकांना उपलब्ध होणे आवश्यक आहे. म्हणून अन्य उमेदवारांच्या उत्तरपत्रिकाही, अपवादात्मक परिस्थितीत, नागरिकांनी मागणी केल्यास दिल्या गेल्या पाहिजेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. निवड समितीतील पाचही अधिकाऱ्यांनी प्रत्येक उमेदवाराला हस्ताक्षरात दिलेल्या गुणांच्या तक्त्याची छायांकित व साक्षांकित प्रत अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी.

३. निवड झालेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तरपत्रिका अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊन त्यांच्या मागणीनुसार कोणत्याही पाच उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती अपीलकर्त्यास निःशुल्क द्याव्यात.

४. अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे यांनी वरील बाबींची पूर्तता करुन दि.१५.५.२०१० पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष विष्णू लिमकर
सुंदरम-४, पोलीस बिनतारी संदेश मुख्यालय,
चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष समाजकल्याण अधिकारी,
पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७४ /२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष विष्णू लिमकर
सुंदरम-४, पोलीस बिनतारी संदेश मुख्यालय, चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष समाजकल्याण अधिकारी,
पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे प्रतिनिधी श्री.एच.ए.इष्टे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.८.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.८.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरून माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.सुभाष विष्णू लिमकर यांनी केली.

श्री.लिमकर यांनी अर्ज केला तेव्हा कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या बदल्या झालेल्या होत्या. प्रभारी अधिकारी असल्यामुळे त्यांनी माहिती दिली नाही. आता सर्व माहिती देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विशेष समाजकल्याण अधिकारी, पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.एच.ए.इष्टे यांनी केले. या निवेदनानुसार अपीलकर्त्यास त्वरित माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा विशेष समाजकल्याण अधिकारी, पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे यांनी आयोगाला त्वरित सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पांडुरंग बाबुराव शेलार
स.नं. १११, कळस, विश्रांतवाडी,
पुणे- ४११ ०१५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर, शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७५ / २००९ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. पांडुरंग बाबुराव शेलार
स.नं. १११, कळस, विश्रांतवाडी, पुणे- ४११ ०१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर, शिवाजीनगर, पुणे-५ श्री. के.एन.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ श्री. मिलिंद प्रमोद सोनले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.५.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.६.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.८.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.८.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

येरवडा गाडीवडार को.ऑप. हौसिंग सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीची खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली असून खोट्या नोंदी व सह्या केल्या आहेत. खरी माहिती मिळावी किंवा दिलेली कागदपत्रे खोटया नोंदीची असल्याची पत्रे जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांनी द्यावी, अशी आपली मागणी असून त्यानुसार कार्यवाही केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. पांडुरंग बाबुराव शेलार यांनी केली.

संदर्भित संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली असून श्री. शेलार यांना मागणीनुसार सर्व कागदपत्रे देण्यात आली आहेत. याच विषयाबाबत त्यांनी केलेला दावा न्यायालयात प्रलंबित आहे. संस्थेकडील मूळ अभिलेखाच्या छायांकित प्रती श्री. शेलार यांना देण्यात आल्या असून त्यातील नोंदी व सह्या खऱ्या की खोट्या हे ठरविणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर श्री. मिलिंद प्रमोद सोनले यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर श्री. मिलिंद प्रमोद सोनले व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे श्री. के.एन. जाधव यांनी योग्य कार्यवाही केली असून त्यांचे प्रतिपादन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** 27 APR 2010

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजयकुमार निवृत्ती चव्हाण
७१/९, फुलेनगर, येरवडा, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर (१), गुलटेकडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८३ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजयकुमार निवृत्ती चव्हाण
७१/९, फुलेनगर, येरवडा, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.के.एम.जाधव

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१), गुलटेकडी, पुणे श्री.एम.पी.सोबले | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | माहिती दिली नाही. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.५.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

म्हाडाने सदनिकेची किंमत १९९२-९३ मध्ये घेऊनही अद्याप हस्तांतरण केलेले नाही. त्यामुळे देखभालीसाठी रक्कम घेतली जात असतानाही गृहरचना संस्थेची देखभाल केली जात नाही, याबाबतची जबाबदारी कोणाची, याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विजयकुमार निवृत्ती चव्हाण यांनी केली.

श्री.चव्हाण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज केला नव्हता, तर तक्रारीच्या स्वरूपाचा अर्ज केला होता. त्यामुळे उत्तर दिले नाही. तक्रारीबाबत तपासणी करून उत्तर देण्याची तयारी असल्याचे त्यांना सांगितले होते. संबंधित विषयात चौकशी करून सादर केलेल्या अहवालाची प्रत त्यांना देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(२), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.एम.पी.सोजले यांनी केले.

म्हाडाने सदनिकांचे हस्तांतरण करण्यासंबंधीचा हा विषय असून आपल्या कार्यालयाच्या कक्षेत येत नाही, असे अपीलकर्त्यास स्पष्ट करण्यात आले, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.के.एम.जाधव यांनी केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर लक्ष्मण पारेकर
बंदी क्र.सी/१४७७६, मंडल क्र.I-५, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण,
चव्हाणनगर, पाषाण, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
बारामती उपविभाग, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण,
चव्हाणनगर, पाषाण, पुणे श्री.रामनाथ पोकळे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
बारामती उपविभाग, ता.बारामती, जि.पुणे श्री.बी.एस.खिलारी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.३.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकापैकी कोणीही हजर न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

इंदापूर पोलीस ठाण्याकडे सिंचन अधिकारी श्री.ढोले यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती जाणीवपूर्वक देण्यात आली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर लक्ष्मण पारेकर यांनी केली.

अपीलकर्ता हे जन्मठेपेची शिक्षा भोगत असून अपिलीय प्राधिकारी यांच्याकडील व आयोगापुढील सुनावणीला ते उपस्थित नव्हते.

श्री.पारेकर यांनी मागितलेली माहिती इंदापूर पोलीस ठाण्याकडून घेण्यात आली. श्री.ढोले यांच्या अर्जाची अभिलेखात नोंद नसल्याचे पोलीस ठाण्याने कळविले. परंतु संबंधित अर्जावरील इंदापूर पोलीस ठाण्याची सहीशिक्क्याची पोहोच अपीलकर्त्याने सादर केली. त्यानंतर याबाबत चौकशी करण्यात आली. अर्जावरील पोहोच सहाय्यक फौजदार श्री.पी.डी.विधाते यांची असून त्याबाबत खोटी माहिती दिल्याबद्दल व मूळ अर्जाची नोंद न केल्याबद्दल त्यांच्यावर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे, असे श्री.पारेकर यांना कळविले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती विभाग, ता.बारामती, जि.पुणे श्री.बी.एस.खिलारी यांनी केले.

आपल्याला ही माहिती मिळाली असली तरी कोणावर कारवाई केली, हा आपला प्रश्न नसून मूळ अर्जानुसार माहिती मिळावी, मूळ अर्ज उपलब्ध नसल्यास तो स्वीकारण्यात आल्यानंतर गहाळ झाला असल्याचे पत्र पोलिसांनी द्यावे, अशी मागणी श्री.पारेकर यांनी लेखी निवेदनात केली आहे.

पोलिस ठाण्यात दिलेल्या अर्जाची पोहोच देऊनही त्याची कागदपत्रे नोंद न करणे ही बाब गंभीर आहे. त्याबाबत संबंधितांवर कारवाई करण्यात येत असली तरी अपीलकर्त्यास मागणीनुसार

माहिती दिली जाणे आवश्यक आहे. मूळ अर्जाची प्रत उपलब्ध नसल्यास तसे स्पष्ट कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती विभाग, ता.बारामती, जि.पुणे यांनी आयोगाला दि.१५.५.२०१० पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महंमद चाँद मुलाणी
द्वारा लालबी चाँद मुलाणी
घर क्र.७६७, दत्तनगर, आरोह मंगल कार्यालयाशेजारी,
आंबेगाव, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस आयुक्त (१), अँटी करप्शन ब्युरो,
सी बरॅक, मध्यवती इमारत, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपायुक्त (१), अँटी करप्शन ब्युरो,
सी बरॅक, मध्यवती इमारत, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपायुक्त (१), अँटी करप्शन ब्युरो,
सी बरॅक, मध्यवती इमारत, पुणे श्री.विश्वास पांढरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.महंमद चाँद मुलाणी यांनी मुद्रांक भ्रष्टाचार प्रकरणातील चौकशी अहवाल व सोबतची कागदपत्रे आदी माहिती मागितली होती. चौकशी चालू असून माहिती उघड करणे तपासावर परिणाम करणारे ठरू शकते. म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारली. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस आयुक्त (१), अँटी करप्शन ब्युरो, सी बॅरक, मध्यवर्ती इमारत, पुणे यांनी त्यांचे अपील फेटाळले. चौकशी पूर्ण झाली नसल्याने माहिती देता येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त (१), अँटी करप्शन ब्युरो, सी बॅरक, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.विश्वास पांढरे यांनी केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२६.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दुर्गादास परशराम शहापूरक ..... **अपीलकर्ता**
ईश्वरगंगा कॉम्प्लेक्स, नेहरू चौक, गउहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर ..... **उत्तरवादी**
२९३५, सी वॉर्ड, जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक,
डीवायएसपीचे आवार, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, गडहिंग्लज,
हावळ बिल्डिंग, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९० / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक ७.४.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दुर्गादास परशराम शहापूरक
ईश्वरगंगा कॉम्प्लेक्स, नेहरू चौक, गउहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर
२९३५, सी वॉर्ड, जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, डीवायएसपीचे आवार, कोल्हापूर श्री.शाम खामकर

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, गडहिंग्लज,
हावळ बिल्डिंग, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.नितीन साळुंखे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक २५.६.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक ३.८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक ८.९.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वारस नोंद प्रकरणातील आपल्याला दिलेली माहिती खोटी व बिनसहीशिक्क्याची आहे. तसेच अशा प्रती बेकायदेशीर असून पानांची संख्या व आकारलेले शुल्क यातही तफावत आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दुर्गादास परशराम शहापूरकर यांनी केली.

श्री.शहापूरकर यांना अर्जानंतर माहिती दिली व प्रथम अपिलाच्या वेळी पुन्हा माहिती दिली. त्यांच्या मागणीनुसार नोंदवहीच्या छायांकित प्रतीसह संचिकेतील त्यांनी मागितलेल्या सर्व कागदपत्रांच्या नकला नि:शुल्क दिल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, गडहिंग्लज, हावळ बिल्डिंग, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.नितीन साळुंखे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर श्री.शाम खामकर यांनी केले. अनेक मुद्दयांमध्ये श्री.शहापूरकर यांनी खुलासा, कारणमीमांसा, कर्मचाऱ्यांचा अभिप्राय घेऊन त्याची नक्कल अशा स्वरूपाची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी मागणी 'माहिती' ठरत नसल्यामुळे तशी कार्यवाही केलेली नाही. तरीही मुद्देनिहाय उत्तर दिले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, गडहिंग्लज, हावळ बिल्डिंग, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.नितीन साळुंखे यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. खुलासा, कारवाई आदी अन्य मागण्या महितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. संबंधित प्रती अधिकृत असल्याचे पत्र कागदपत्रांच्या यादीसह जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, गडहिंग्लज, हावळ बिल्डिंग, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांनी सहीशिक्क्यानिशी अपीलकर्त्यास द्यावे अथवा प्रती प्रमाणित करून द्याव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. मनोज मच्छिंद्र काळंगे
मु.पो.तक्रारवाडी, ता.इंदापूर
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था इंदापूर, ता.इंदापूर,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
भैरवनाथ पाणीपुरवठा सेवा सहकारी संस्था मर्यादित,
भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/०४/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/०६/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६/०७/२००९ |
| ५ | **उपस्थिती**<br>**अपीलकर्ता**<br>श्री. मनोज मच्छिंद्र काळंगे<br>मु.पो.तक्रारवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे<br>**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**<br>भैरवनाथ पाणीपुरवठा सेवा सहकारी संस्था मर्यादित, भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे<br>श्री.तानाजी अर्जुन शिर्के<br>**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**<br>सहकारी संस्था, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे<br>प्रतिनिधी - श्री.पंकज न.राऊत | |

| | |
|---|---|
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री भैरवनाथ पाणीपुरवठा सेवा सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांच्या बंधपत्रांच्या छायाप्रती, भूधारक नसलेल्या संचालकांची यादी, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीमधून पाईपलाईन गेली आहे, त्यांच्या संमतीपत्राच्या छायाप्रती व पाईपलाईन बाबतची तांत्रिक माहिती |

## विवेचन

'मला हवी असलेली सर्व माहिती मिळाल्याने कोणतीही तक्रार राहिलेली नाही', असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. मनोज मच्छिंद्र काळंगे यांनी दि.८/०४/२०१० रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**पुणे.**
**दि :-** 21 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. गोविंद श्रीधर जोशी
श्रीधर अपार्टमेंट, प्लॉट नं.१५,
सर्व्हे नं.२६, हिंगणे खुर्द, पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, शिवाजीनगर, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य कार्यकारी (प्रशासन) ,
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२००९ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता -** श्री. गोविंद श्रीधर जोशी
श्रीधर अपार्टमेंट, प्लॉट नं.१५, सर्व्हे नं.२६, हिंगणे खुर्द, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, शिवाजीनगर, पुणे तर्फे प्रतिनिधी
श्री. राजेंद्र निंबाळकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य कार्यकारी (प्रशासन) ,
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, शिवाजीनगर, पुणे श्री. राजेंद्र निंबाळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१०.२००९ |

६ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतल्यामुळे आपण विस्थापित झालो असून पुनर्वसनासाठी जमीन मिळावी, यासाठी सन १९९५ पासून आपण पत्रव्यवहार करीत आहोत. त्याबाबतची माहिती व जमीन दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. गोविंद श्रीधर जोशी यांनी केली.

श्री. जोशी यांच्या मागणीप्रमाणे जमीन देण्याची तरतूद नाही. तसे त्यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे व समक्ष चर्चेतही स्पष्ट केले आहे. तरीही पुन:पुन्हा त्याच स्वरुपाची मागणी ते करीत असतात. त्यांच्या अर्जाला पुन्हा तेच उत्तर देणे आवश्यक होते, परंतु शेती महामंडळातील प्रश्नांच्या संदर्भातील विविध समित्या, अतिरिक्त कार्यभार आदींमुळे या अर्जाचे उत्तर विहित मुदतीत दिले गेले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, शिवाजीनगर, पुणे श्री. राजेंद्र निंबाळकर यांनी नमूद केले व संपूर्ण विषयाची पार्श्वभूमी लक्षात घेता विलंब क्षमापित करण्याची विनंती केली. ती मान्य करण्यात येत आहे. अपीलकर्त्याची जमिनीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 29 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अमोल अरविंद बनकर
मु.पो. निळुंज, ता. पुरंदर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पुरंदर
ता. पुरंदर, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,पुरंदर
ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ६.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अमोल अरविंद बनकर
मु.पो. निळुंज, ता. पुरंदर, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,पुरंदर
ता. पुरंदर, जि. पुणे श्री. व्ही. एस. विरणक, निवडणूक नायब तहसीलदार, पुरंदर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.७.२००९ |

६ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

संजय गांधी निराधार योजनेतील पैसे न मिळाल्याची तक्रार करणारा व अपात्र व्यक्तींना ते अपात्र असल्याचे कळविण्याची मागणी करणारा अर्ज अपीलकर्ता श्री. अमोल अरविंद बनकर यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर, ता. पुरंदर यांच्याकडे केला होता. अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. तथापि अपेक्षित माहिती मिळाली असून कोणतीही तक्रार नाही, अपील निकाली काढावे, असे लेखी निवेदन श्री. बनकर यांनी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे

दि. 29 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश गणपतराव वरूडकर
द्वारा श्री. राजेश सोनपराते
प्लॉट नं.६०/१८, दादू चौगुले नगर,
कळंबा, कोल्हापूर-७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक व
शालेय समिती सचिव, जय शिवराम हायस्कूल,
क ।। ठाणे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०९ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. रमेश गणपतराव वरूडकर
द्वारा श्री. राजेश सोनपराते
प्लॉट नं.६०/१८, दादू चौगुले नगर,
कळंबा, कोल्हापूर-७

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी
एस. ए. गिरी, उपशिक्षणाधिकारी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक व
शालेय समिती सचिव, जय शिवराज हायस्कूल, क।। ठाणे,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.७.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.८.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.९.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्याला अपुरी व चुकीची माहिती मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. रमेश गणपतराव वरूडकर यांनी केली.

अपीलकर्ता त्यांच्या व्यक्तिगत कामासाठी दबाव आणण्याकरिता सातत्याने अर्ज करून मुख्याध्यापकांना त्रास देत असतात. आतापर्यंत त्यांनी २०/२५ अर्ज केले आहेत. संस्थेत वाद असून संस्थेकडील माहिती मुख्याध्यापक देऊ शकत नाहीत. मुख्यापकांकडील माहिती त्या त्या वेळी दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी मुख्याध्यापक व शालेय समिती सचिव, जय शिवराज हायस्कूल, क।। ठाणे, व त्यांचे प्रतिनिधी ॲड. अशोक एच. पाटील यांनी केले. संस्थांतर्गत वाद असल्यामुळे मुख्याध्यापक संस्थेकडील माहिती देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. एस.ए. गिरी यांनी केले. संस्थांतर्गत वाद असल्याचे अपीलकर्त्यानेही मान्य केलें.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व शालेय समिती सचिव, जय शिवराज हायस्कूल का. ठाणे, ता. पन्हाळा श्री. तात्यासो शामराव पाटील यांनी माहिती देण्यातील आपली अडचण वेळोवेळी स्पष्ट केली आहे. तसेच संस्थातर्गत वादामुळे संस्थेतील माहिती मुख्याध्यापकांना उपलब्ध होऊ शकत नाही, असे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन स्पष्ट होते. या स्थितीत मुख्याध्यापकांकडेच संस्थेकडील माहिती मागणारे अर्ज अपीलकर्त्याने सातत्याने करणे अप्रस्तुत, तसेच संबंधित यंत्रणेवर अकारण ताण निर्माण करणारे आहे. अशा प्रकारे सर्व यंत्रणाचा वेळ व परिश्रम याचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे

दि. 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिरीष जयसिंग शिंदे ..... **अपीलकर्ता**
एस-१, बिल्डिंग नं.५२, मथुरा अपार्टमेंट, अंबाई टँक, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासन अधिकारी, प्रार्थमिक शिक्षण मंडळ, ..... **उत्तरवादी**
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रार्थमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९१० / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक ७.४.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिरीष जयसिंग शिंदे
एस-१, बिल्डिंग नं.५२, मथुरा अपार्टमेंट, अंबाई टँक, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासन अधिकारी, प्रार्थमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.ए.आर.पोतदार

**जन माहिती अधिकारी तथा** कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.ए.एम.नदाफ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १७.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक २६.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २५.५.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी जाणीवपूर्वक दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शिरीष जयसिंग शिंदे यांनी केली.

अपीलकर्ता हे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण मंडळाचे निलंबित कर्मचारी आहेत. अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील कॉम्प्युटर ऑपरेटरचे पद भरलेले नाही. रूपये ३०० मानधन शिपायांना देऊन तत्संबंधी काम केले जाते, याची सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली आहे, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.ए.एम.नदाफ यांनी केले. श्री.शिंदे यांनी या संदर्भात आतापर्यंत १६ अर्ज केले आहेत. त्यांच्या अर्जातील सर्व मुद्दयांचे उत्तर व अनुषंगिक काही माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपाद विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.ए.आर.पोतदार यांनी केले. जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नंदकिशोर वि. थोरात
देवी लिंक हाऊसिंग सोसायटी,
ई-८, लिंक रोड, चिंचवड, पुणे-३३.
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, (माध्यमिक), पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, (माध्यमिक), पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २३.३.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नंदकिशोर वि. थोरात
देवी लिंक हाऊसिंग सोसायटी, ई-८, लिंक रोड, चिंचवड, पुणे-३३.

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, (माध्यमिक), पुणे श्री. प्रकाश परब

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.२.२००८ |

६ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील जन्म तारखेतील चूक महानगरपालिकेच्या शिक्षण प्रमुखांच्या आदेशानुसार दुरुस्त केली. परंतु या जन्म तारखेच्या नोंदीसह शाळा सोडल्याचा दाखला दिला जात नाही व त्याबाबतच्या कार्यवाहीची मागणी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, (माध्यमिक), पुणे यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नंदकिशोर वि. थोरात यांनी केली.

श्री. थोरात यांच्या मागणीच्या स्वरुपातील अभिलेख केवळ एक वर्षाकरिता जतन केले जातात, तसेच शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील जन्म तारीख, नाव यातील बदल शाळा सोडल्यानंतर करता येत नाही, असे संबंधित नियमावलीच्या उल्लेखासह श्री. थोरात यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, (माध्यमिक), पुणे श्री. प्रकाश परब यांनी केले. तशा आशयाचा अहवाल शाळा प्रमुखांच्या खुलाशाच्या प्रतीसह अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, (माध्यमिक), पुणे श्री. प्रकाश परब यांनी दि. १२.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ...खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बुरहान बाबासो नायकवडी
रा. आर स.नं. ८३१, प्लॉट नं.२४, साई पार्क,
ई वॉर्ड, भोसलेवाडी, बावडा रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपायुक्त,
ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर पोलिस अधीक्षक,
अपर पोलीस उपआयुक्त, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९८ / २००९/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.११.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

हरवलेल्या मोबाईलबाबतची आपण मागितलेली सर्व माहिती मिळाली असून तपशिलाबाबत समाधान झाले आहे, त्यामुळे अपील निकाली काढावे, असे अपीलकर्ता यांनी दि. ५.४.२०१० च्या पत्राद्वारे आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 APR 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.